शिवाजी महाराजांची स्वराज्यविषयक संकल्पना

डॉ.श्रीमती पद्मा मोहनराव जाधव
सहयोगी प्राध्यापक
शासकीय अध्यापक महाविद्यालय,परभणी.

प्रास्ताविक

जिजाबाईंच्या पोटी एका कर्तृत्ववान सुपुत्राचा, शिवाजी महाराजांचा जन्म ही घटना महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारी ठरली. बालवयातच त्यांनी स्वराज्य संस्थापनेच्या कार्याला प्रारंभ केला. त्यांची संपूर्ण हयात स्वराज्य स्थापना विस्तार आणि स्वराज्य संरक्षण यात खर्च झाली.

जिजाबाई आणि शहाजीराजे या उभयंतांच्या प्रयत्नपूर्वक आणि जाणीवपूर्वक तसेच विशिष्ट उद्देशाने बालपणापासून केलेल्या सुसंस्कारातून शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व घडले. जात्याच प्रगल्भ बुध्दीमत्ता लाभलेल्या शिवाजी महाराजांनी मोठेपणी विविध विषयांचा अभ्यास, चिंतन, मनन करुन स्वत:चा विकास केला. तसेच आजूबाजूच्या परिस्थितीचाही त्यांनी बारकाईने अभ्यास केला आणि स्वराज्य व सुराज्य स्थापनेची स्वत:ची भूमिका समजून घेतली व त्या भूमिकेशी समरस झाले. जिजाबाई आणि शिवाजी महाराजांना स्वराज्य निर्मितीची ही संधी शहाजीराजांनी प्राप्त करुन दिली. स्वराज्य स्थापनेमधील शिवाजी महाराजांचे प्रेरणास्थान खुद्द त्यांचे माता-पिता हेच होते माता-पित्याच्या कार्य आणि कर्तृत्वाचा, आचार-विचारांचा, प्रभाव शिवाजी महाराजांच्या चारित्र्यावर पडलेला दिसतो.

जिजाबाईंनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपल्या जाणीवर्पूक सुसंस्कारांच्या बळावर शिवाजी महाराजांच्या रुपाने एक महान व्यक्तिमत्व घडविले. राष्ट्रीयत्व, स्वातंत्र्य आणि सर्वधर्म समभावाचे बाळकडू त्यांनीच शिवाजी महाराजांना दिले. त्यांच्या कर्तृत्वावर जिजाबाईंच्या शिकवणूकीचा, मार्गदर्शनाचा आणि नैतिक आदर्शाचा ठसा उमटलेला होता. बारा वर्षांच्या शिवबाला घेऊन जिजाबाई आपल्या पुण्याच्या जहागिरीत प्रवेशल्या. त्या क्षणापासून शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक आणि सिंहासनारोहणापर्यंत स्वराज्याची निर्मिती आणि विस्तार या सर्व घटनांमध्ये शिवाजी महाराजांबरोबर त्या होत्या. त्यांनी शिवाजी महाराजांवर केलेले संस्कार, स्वराज्याचे त्यांच्या डोक्यात भरविलेले वेड, सर्वधर्मसमभावाची दिलेली शिकवण यांची शिवाजी महाराजांनी संपूर्ण आयुष्यभर जाण ठेवली व शहाजीराजे आणि जिजाबाई यांच्या तेजाचे त्यांच्यात संक्रमण झालेले होते हे त्यांनी सिध्द करुन दाखविले.

शिवाजी महाराजांची स्वराज्यविषयक संकल्पना

शिवाजी महाराजांची हिंदवी स्वराज्यविषयक संकल्पना अत्यंत व्यापक होती. हिंदवी स्वराज्याचा त्यांना अपेक्षित असलेला अर्थ मर्यादित नसून अत्यंत व्यापक होता "(हिंदवी) स्वराज्याचा अर्थ केवळ हिंदुचे राज्य एवढा मर्यादित नाही तर सर्व जाती-धर्माच्या स्थानिक रयतेचे (प्रजेचे) राज्य होय."

शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेची जी मोहीम उभारली होती ती आरंभीपासूनच हिंदवी स्वराज्य अथवा एतद्देशीयांचे राज्य स्थापन व्हावे आणि या देशातून परकीय सत्तेचे उच्चाटन व्हावे यावर आधारित होती. यवनी परचक्राने गांजलेल्या जनतेची परकीय सत्तेच्या गुलामगिरीतून सुटका व्हावी या हेतुने हिंदवी स्वराज्य स्थापन करावे हे त्यांचे ध्येय होते. त्यांनी दि.१७ एप्रिल १६४५ रोजी दादाजी नरसप्रभू यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलेले आहे की, "हे राज्य व्हावे अशी श्रींचीच इच्छा दिसते" आणि आपले हे ध्येय साध्य करण्यासाठी त्यांनी संपूर्ण हयाभर त्यांनी प्रयत्न केले. यासाठी त्यांनी जनतेला सोबत घेऊन, जनतेसोबत राहून, जनतेकडे नेतृत्व सोपवून जनतेच्या सामर्थ्यांवर जनतेच्या आकांक्षा साकार करण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

मिर्झा राजे जयसिंग या राजपूत सरदाराला औरंगजेब बादशहाने शिवाजी महाराजांना इ.स.१६६५ मध्ये पकडण्यासाठी पाठविले. त्यावेळी शिवाजी महाराजांनी मिर्झा राजे जयसिंगांला पाठविलेल्या पत्रात म्हटले की, "आपण पुकारलेली लढाई परकीय सत्तेविरुध्द आणि हिंदवी (एतद्देशीय) राज्य स्थापन करण्यासाठी उभारलेली मोहीम आहे' स्वराज्य स्थापनेच्या या पवित्र कार्यात मिर्झा राजे जयसिंगांनी मदत करावी अशी शिवाजी महाराजांनी विनंती केली. यावरुन शिवाजी महाराजांचा उद्देश हिंदवी स्वराज्य स्थापनेचा होता हे सिध्द होते.

शिवाजी महाराज सामाजिक पिळवणूक, नफेखोरी, लाचलुचपत या प्रवृत्तीच्या विरोधात होते. त्यांच्या बालपणीच्या जीवनाचा आढावा घेतल्यास असे दिसून येते की, ते बालपणापासूनच मावळच्या सामान्य जनतेत मिळून - मिसळून वगात असे. त्याचाच परिणाम म्हणजे त्यांना सामान्य जनतेच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचा जवळून परिचय होता. त्यांनी बालपणीच यवनी अत्याचारांमुळे बेचिराख झालेली गावे, उध्वस्त होणारी उभी पिके आणि वतनदारांकडून होणारे अत्याचार इत्यादी स्वतः जवळून पाहिले होते. त्यामुळेच त्यांनी स्वराज्यावर जीव ओवाळून टाकणारी तानाजी मालुसरे, येसाजी कंक, त्रिबंक सोनदेव यांच्यासारखी माणसं जोडली जी स्वराज्य उभारणीच्या कार्यात अखरेच्या श्वासापर्यंत एकनिष्ठ राहिली. गनिमी कावा या तंत्राचा अवलंब केला. आपल्या सहकाऱ्यांना देखील या रणनीतीचे प्रशिक्षण दिले. त्यांची हिंदवी स्वराज्याची कल्पना लोककल्याणकारी राजनीतीवर आधारलेली होती. त्यांचा कारभार जाती-धर्मनिरपेक्ष तत्वावर आधारलेला होता. त्यामुळेच तो जनतेच्या हिताचा होता. त्याला जनतेचा पाठिंबा होता. या कारभारात गावातील अतिसामान्य गावकामगारांपासून सर्व जाती धर्माच्या लोकांचा समावेश होता. शांतता व सुव्यवस्था ही त्यांनी निर्माण केलेल्या स्वराज्याची वैशिष्टये होती. त्यामुळेच जनतेच्या मनात स्वराज्याप्रती विश्वास निर्माण झाला होता. जनतेचे खरे राज्य ही त्यांना अपेक्षित असलेली स्वराज्याची खरी संकल्पना होती. ज्या व्यवस्थेत सर्व जाती धर्मियांना राज्यकारभार चालविण्याची संधी होती.

शिवाजी महाराजांनी हिंदू आणि मुस्लिम यांच्या प्रार्थनास्थळांमध्ये फरक केला नाही. सर्व धर्मियांना त्यांनी समानतेने वागविले. जेजुरीचा मुल्ला सैद बुऱ्हाणा, सैद मलिक, सैद जाना खादन यांना मशिद आणि पीर यांच्या सेवेसाठी शहाजी राजे आणि शिवाजी महाराजांनी जमीनी इनाम दिल्या होत्या. त्यांचा धार्मिक बाबींकडे पाहण्याचा दृष्टिकोन अत्यंत डोळस होता ते धार्मिक प्रवृत्तीचे असले तरी अंधश्रध्दाळू नव्हते. त्यांना सर्वच धर्मांबद्दल आदर होता. त्यांचे धार्मिक धोरण संहिष्णूतेचे आणि अत्यंत उच्च कोटीचे होते. जे स्वराज्य आणि सुराज्य निर्मितीसाठी अत्यावश्यक होते.

शिवाजी महाराजांनी स्वराज्यास बळकटी आणण्यासाठी आरमारात आणि सैन्यात सर्व जाती धर्माच्या लोकांना समान स्थान दिल होते. आरमारात मुस्लिम, ख्रिश्चन, हिंदु, भंडारी, कोळी यांच्याबरोबरच एके काळी समाजाने शुद्र म्हणून वंचित आणि उपेक्षित ठेवलेल्या लोकांना देखील आरमारात सन्मानाची जागा व वागणूक दिली. शिवाजी महाराज खऱ्या अर्थाने क्रांतीकारक होते असे म्हणता येईल. कारण परधर्मात गेलेल्या हिंदुना पुन्हा स्वधर्मात येण्याची संधी दिली. प्रस्थापित विचारांना फाटा देऊन शुध्दीकरणाचा अभिनव क्रांतीकारक विचार समाजात रुजविला. त्यांना गुलामगिरीची अत्यंतिक चीड होती. याच काळात युरोपमध्ये गुलामांचा व्यापार होत होता. शिवाजी महाराजांनी मुस्लिम आणि युरोपियांकडून होणाऱ्या गुलामांच्या व्यापारावर बंदी घातली. यावरुन ते परकीयांच्या हालचालींवर किती काटेकोरपणे लक्ष आणि नियंत्रण ठेवून होते हे सिध्द होते. स्वराज्याला स्वकीयांकडून आणि परकियांकडून धोका होऊ नये याची ते सतत काळजी घेत असे.

शिवाजी महाराज साधु-संत, फकीर यांना मान देत मग ते कोणत्याही जाती-धर्माचे असो. त्याचप्रमाणे स्त्रियांबद्दल तर त्यांना नितांत आदर होता. शिवाजी महाराजांच्या संहिष्णूतेबद्दल खाफीखान या मुस्लिम इतिहासकाराने म्हटले आहे की, "शिवाजीने सैन्याकरीता असा सक्त नियम केला होता की, सैनिक ज्या-ज्या ठिकाणी लूट करण्यास जातील तेथे-तेथे त्यांनी मशिदीस, कुराण ग्रंथास अथवा कोणत्याही स्त्रीस त्रास देता कामा नये. एखादा कुराण ग्रंथ हातात आला तर त्याबद्दल पुज्यभाव दाखवून तो आपल्या मुसलमान लोकांच्या स्वाधीन करीत असे. केव्हाही हिंदु किंवा मुस्लिम स्त्री हाती सापडल्यास किंवा त्यांचे रक्षण करण्यास कोणी जवळ नसल्यास त्यांचे नातलग त्यांची सुटका करण्यास येईपर्यंत शिवाजी स्वतः तिची काळजी करीत असे." एका पत्रात रघुनाथ पंडितरावांनी शिवाजी महाराजांच्या आज्ञेचा उल्लेख केलेला आहे. ती आज्ञा म्हणजे," ज्यांचा जो धर्म त्यांचा त्यांनी करावा यात कोणी बखेडा करु नये" स्वराज्यासाठी यापेक्षा वेगळया दृष्टीची आवश्यकता नाही असे वाटते.

एकंदरीत शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापन करुन सर्वधर्मियांना एकत्र आणले आणि त्यांचा उपयोग परकियांच्या विरुध्द लढण्याकरिता केला. त्यांच्या संहिष्णू वृत्तीची अनेक उदाहरणे सांगता येतील. त्यांच्या आरमाराचा प्रमुख दर्यासारंग दौलतखान हा मुसलमान होता. तसेच इब्राहीम खान हा तौफ खान्याचा प्रमुख होता जो एक अत्यंत इमानी मुसलमान सरदार होता. शिवाजी महाराजांनी दिनांक १५ एप्रिल १६७४ रोजी फोंडा किल्ल्याला वेढा दिला. या लढाईत आदिलशहाचा सरदार बहलोलखान याच्या विरुध्द इब्राहीमखानने निशाण हातात घेऊन शौर्य गाजवून ते किल्ल्यावर रोवले. शिवाजी महाराजांनी त्याच्या शौर्याचे कौतुक केलेच शिवाय इब्राहिमखानास तेथील सुभेदार म्हणून नेमले. त्यांचा अंगरक्षक मदारी मेहतर तर वकील काजी हैदर अशी एक ना अनेक गुणी

माणसे त्यांच्या पाठीशी उभी राहिलीत. शिवाजी महाराजांना माणसांची पारख होती. म्हणून अशा कर्तबगार माणसांच्या बळावर त्यांना स्वराज्याची उभारणी करता आली.

शिवाजी महाराजांचे कार्य विशिष्ट जाती किंवा धर्माकरिता मर्यादित नसून अमर्याद राष्ट्रीय वृत्तीचे होते. त्यांच्या स्वराज्यात सर्वांना धर्मांचे स्वातंत्र्य होते. "क्षत्रिय कुलवंतस श्री राजा शिवछत्रपती" ही रयतेने दिलेली उपाधी. यावरुनच त्यांच्या कार्याचे मोठेपण सिध्द होते. दोन वेळा राज्याभिषेक करुन घेणारे जगाच्या पाठीवरील ते एकमेव राजे होते.

शिवाजी महाराज हे असे सर्वांचे कल्याण साधणारे, द्रष्टये, लोककल्याणकारी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक होते. त्यांनी जाती-भेदाचे, उच्च-निचतेचे उच्चाटन करुन धर्मनिरपेक्ष राज्य स्थापन केले. त्यांनी जनतेच्या मनात राजाबद्दल, राज्याबद्दल विश्वास निर्माण केला. हे आपले, आपल्यासाठी, आपल्या राजाने निर्माण केलेले राज्य आहे ही भावना जनतेच्या मनात निर्माण केली. आश्वासक, विश्वस्त, दूरदृष्टीचा आणि दिव्यदृष्टीचा असा राजा जगाच्या इतिहासात घडून गेला. छत्रपती शिवाजी महाराजांची स्वराज्याची, स्वातंत्र्याची संकल्पना डोळस, दूरदृष्टीची आणि दिव्यदृष्टीची होती. राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शिवाजी महाराजांचा दृष्टीकोन धर्मनिरपेक्ष, कल्याणकारी, जाती-पाती विरहीत आणि उदात्त होता. शिवाजी महाराजांचा हा दृष्टीकोन केवळ आजच नाही तर भविष्यातही आपणास उपयुक्त ठरणारा आहे. शिवाजी महाराजांची स्वराज्याची संकल्पना जर आज साकार झाली तर भारत हे राष्ट्र जगाला मार्गदर्शक ठरेल हे निश्चित आहे.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com